**नि.फौ.ख. क्रमांक ३६/२०१८**
**निशाणी क्रमांक ८१**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

**माझे नाव** – आहलीबाई भिका पटले,
**वय** – सज्ञान, **व्यवसाय** – शेती,
**राहणार** – मांडवी, रुणमालपाडा, ता. धडगांव.

**सरतपास सरकारतर्फे सहा. सहकारी अभियोक्ता श्री. बी. आर. वळवी यांच्या मार्फत.**

घटना ही दि. १८ रोजी गेल्या चार वर्षापुर्वी सायंकाळी ०७.०० वाजेच्या सुमारास घडली होती. सदरील दिवशी मोजा काकडया वळवी, भगतसिंग मोज्या वळवी, जामसिंग मोज्या वळवी, विजय कागडया वळवी, मोहन कागडया वळवी, सुभाष डुंग्या वळवी, बाज्या डुंग्या वळवी, आंबीबाई मोहन वळवी, ललीता मोज्या वळवी व जुगा काकडया वळवी असे मोज्या काकडया वळवी यांचा घराजवळ गर्दी करुन उभे होते. तेव्हा माझी मुलगी सरीता पाणी घेण्यासाठी नाल्यावर जात असतांना तिला आंबीबाई व ललीता यांनी थांबविले व तिला दोघांनी मारहाण केली. त्यानंतर मी तिथे पळत गेली व माझ्या मुलीला मारहाण करु नका असे सांगितले. म्हणुन मला डेंगाऱ्याने भगतसिंग याने डाव्या हाताच्या आंगठयाला मारहाण करुन दुखापत केली. त्यानंतर मी ग्रामीण रुग्नालय धडगांव येथे औषधोपचार केला होता.

२. त्यानंतर मी धडगांव पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली व त्या अनुषंगाने प्रथमखबर नोंदविली होती. (आता साक्षीदाराला फिर्याद व प्रथमखबर अहवाल दाखविण्यात आला.) सदरील फिर्याद व प्रथम खबर हे तेच असुन त्यावर माझा आंगठा आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्याद व प्रथमखबरी अहवालास **नि.क्र. ८२ व नि.क्र. ८३** देण्यात येत आहे.

३. आरोपीने मला ज्या डेंगाऱ्याने मारले तो मी ओळखु शकतो. (आता साक्षीदाराला डेंगारा **(पी.आर. क्र. ७/२०१८)** दाखविण्यात आली.) सदरील डेंगारा हा तोच असुन त्याला **आर्टीकल अ** देण्यात येत आहे. मी आरोपींना ओळखते. ते आज रोजी न्यायालयात हजर आहेत. फक्त आरोपी भगतसिंग मोज्या वळवी हजर नाही.

**सदरील प्रकरणात आरोपी हजर असुन आरोपींचे वकील गैरहजर आहेत. तसेच, आरोपींतर्फे कुठलाही अर्ज दाखल केलेला दिसुन येत नाही. म्हणुन आरोपींविरुध्द फौ.प्र. सं. कलम ३०९ (क) अन्वये उलटतपास नाही चा आदेश पारित करण्यात येत आहे.**

उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by Dipak Gokul Kankhare
Date: 2022.03.16 14:54:19 +0530

धडगांव **(दिपक गो. कंखरे)**
दिनांक १६.०३.२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, धडगांव.